मा.सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य,पुणे यांचेकडील स्टाफ पॅटर्न मंजूरी पत्र क्र. ना.बँकां/डी-४/भं.अ.बँक/स्टा. पॅ./नो.भ./११४८ दिनांक ९/५/२००७ नुसार बँकेच्या तृतीय श्रेणी (लिपीक) व चतुर्थ श्रेणी (शिपाई) मधील रिक्त पदे सरळसेवेने भरावयाची आहेत. त्यानुसार ईच्छुक व पात्र उमेद्वारांकडून सदर जाहिरातीद्वारे दिनांक ५/३/२०१३ ते १२/३/२०१३. पर्यंत फक्त ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहे.

पदनिहाय रिक्त पदांचा तपशिल खालील प्रमाणे

**पदाचे नांव: तृतीय श्रेणी (लिपीक)** भरावयाची एकुण पदे: ९

| श्रेणी | अ.जा. | अ.ज. | भ.ज. (अ/क/ड) | इमाव | खुले | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|
| तृतीय श्रेणी (लीपीक) | १ | ५ | १/१/१ | - | - | ९ |

**पदाचे नांव: चतुर्थ श्रेणी (शिपाई)**भरावयाची एकुण पदे: ६

| श्रेणी | अ.जा. | अ.ज. | भ.ज. (अ/क/ड) | इमाव | खुले | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|
| चतुर्थ श्रेणी(शिपाई) | - | - | - | १* | ५* | ६ |

१) वरील * अंतर्गत दर्शविलेली संख्यांमध्ये इमाव अंतर्गत एक पद प्रकल्पग्रस्त करीता राखीव असुन, खुले अंतर्गत एक पद अपंग (अंध/मुकबधीर/अस्थिव्यंग ५०% व त्यापेक्षा कमी ) करीता राखीव आहे. समांतर आरक्षण अंतर्गत पात्र उमेद्वार उपलब्ध्द न झाल्यास त्याच सामाजिक प्रवर्गातील उमेद्वारांमधुन सदर पद भरले जाईल.

२) राखीव प्रवर्गात अर्ज सादर करणा-या उमेद्वारांकडे जात प्रमाणपत्र व वैधता प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.

३) सदर पदसंख्येमध्ये कमी जास्त बदल होण्याचा संभव आहे. म्हणून याबद्दल उमेद्वारांची कोणतीही तक्रार ग्राह्य धरण्यात येणार नाही. हे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी राखुन ठेवले आहेत.

**उमेदवाराची शैक्षणिक अर्हता :**

खाली नमूद केलेली शैक्षणिक अर्हता दिनांक १.३.२०१३ रोजी प्रमाणपत्रासहीत पूर्ण धारण करणे आवश्यक आहे.

| क्र. | पदाचे नांव व वेतनश्रेणी | आवश्यक शैक्षणिक पात्रता |
|---|---|---|
| १ | तृतीय श्रेणी (लीपीक)<br>४०००-१००-६००० | १) उमेदवार मान्यताप्राप्त विद्यापीठाचा कोणत्याही शाखेचा किमान पदवीधर असावा.<br>२) उमेदवार MS-CIT किंवा यापेक्षा उच्च संगणक अर्हता धारक असावा.<br>वरील दोन्ही पेक्षा उच्च अर्हता उमेदवार सुध्दा अर्ज करु शकतील |
| २ | चतुर्थ श्रेणी (शिपाई)<br>३०५०-७५-३९५०-८०-४५९० | उमेदवार किमान ९ वा वर्ग उत्तीर्ण असावा. |

**पदाकरीता वयोमर्यादा**

१) उपरोक्त पदाकरीता दिनांक १.३.२०१३ रोजीची वयोमर्यादा गणली जाईल.
२) उमेदवाराचे वय १८ वर्षापेक्षा कमी व ३३ वर्षापेक्षा जास्त नसावे. मागावर्गिय उमेदवारांकरीता वय १८ वर्षापेक्षा कमी व ३८ वर्षापेक्षा जास्त नसावे.
३) प्रकल्पग्रस्त उमेदवारांकरीता वय १८ वर्षापेक्षा कमी व ४५ वर्षापेक्षा जास्त नसावे.

**परिक्षा शुल्क :**

१) लिपीक पदाकरीता : रुपये ३००/-
२) शिपाई पदाकरीता : रुपये २००/-

**परिक्षा शुल्क कोणत्याही बँकेचा 'दि भंडारा अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि, भंडारा ' या नावाने ' भंडारा' येथे देय डिमांड ड्राफ्ट द्वारे ऑनलाईन फॉर्म भरलेल्या प्रिंट सोबत बँकेच्या पत्त्यावर दिनांक १६/३/२०१३ पर्यंत पोचते होईल या बेताने सादर करावेत. परिक्षा दिनांक १७/३/२०१३ ला घेण्यात येईल. अर्जदारांनी कॉल लेटर प्राप्त न झाल्यास बँकेचे वेळेत संपर्क साधावा.**

**विशेष सूचना:**

**ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करण्याची सविस्तर सुचना http://www.bucbank.com या वेबसाईटवर उपलब्ध्द आहे.**

१) नियुक्ती देणेचे नियमात , पदसंख्येत/ आरक्षणात बदल करणे , रद्द करणेचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी यांना राहातील.
२) शासनाने भरती बाबद/नियुक्ती बाबद वेळोवेळी निर्गमीत केलेले शासन निर्णय, परिपत्रके, आदेश इत्यादी लागु राहतील.
३) भरतीच्या नियमांमध्ये प्रक्रीया पूर्ण होई पर्यम्त सुधारीता शासन निर्णय/ परिपत्रकानुसार बदल होऊ शकतो.

**अर्ज करण्याची पध्दत:**

१) प्रस्तुत पदाकरीता फक्त अधिकृत संकेतस्थळावरुन विहित पध्दतीने भरलेले ऑनलाईन पध्दतीने केलेले अर्ज स्वीकारण्यात येतील. इतर कोणत्याही प्रकारे अर्ज स्वीकारण्यात येणार नाहीत. सदर संकेतस्थळाला प्रक्रीयेदरम्यान वेळोवेळी भेट देऊन भरती प्रक्रीयेची माहितीबाबद अद्यावत राहण्याची जवाबदारी उमेदवाराची राहील.
१) पात्र उमेदवाराला ऑनलाईन अर्ज http://www.bucbank.com या वेबसाईटवर दिनांक ५/३/२०१३ ते १२/३/२०१३ या कालावधीत सादर करणे आवश्यक राहील. ऑनलाईन अर्ज स्विकारण्याच्या अंतीम तारखेनंतर लींक बंद केली जाईल.

२) ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करण्याची सविस्तर सुचना http://www.bucbank.com या वेबसाईटवर उपलब्ध्द आहे. या वेबसाईटवर ऑनलाईन अर्ज पुर्ण भरल्यानंतर फॉर्मची प्रींट व डिमांड ड्राफ्ट निर्धारीत मुदतीत बँकेत प्राप्त होईल या बेताने सादर करणे आवश्यक राहील.

३) ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करतांना उमेदवाराजवळ स्वत:चा चालू ई मेल आयडी असणे अवश्यक आहे. पुढील सर्व पत्रव्यवहार उमेदवाराने ऑनलाईन अर्जात नोंदविलेल्या ई मेल आयडी द्वारे होणार असल्याने अचूक ई मेल आयडी नोंदविणे आवश्यक आहे व याबाबद उमेदवारास कोणतीही तक्रार करता येणार नाही. ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करतांना उमेदवाराजवळ स्वत:चा अद्यावत पासपोर्ट साईज फोटो असणे आवश्यक आहे. तसेच स्वत:चा फोटो स्कॅन करुन अपलोड करणे अनिवार्य आहे.

४) ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरावयाच्या बाबींचा तपशिल वेबसाईटवर उपलब्ध आहे.

५) उमेदवाराने ऑनलाईन अर्ज भरल्यानंतर दिनांक १३/३/२०१३ ते १७/३/२०१३ पर्यंत संकेतस्थळावरुन परिक्षेचे प्रवेशपत्र डाऊनलोड करुन घ्यावे.

**पदांच्या निवडीसाठी कार्यपध्दती, अटी व शर्ति:**

१) उमेदवाराचे अर्ज ऑनलाईन पध्दतीने स्विकारण्यात येणार असल्याने अर्ज करतांना शैक्षणिक कागदपत्र व अन्य कागदपत्र जोडणे आवश्यक नाही. परंतू ऑनलाईन अर्जामध्ये संपूर्ण माहिती भरणे आवश्यक आहे. ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरतांना काही त्रुटी राहिल्यास व अर्ज नाकारल्या गेल्यास त्याची सर्वस्वी जवाबदारी उमेदवाराची राहील या बाबद उमेदवारास तक्रार करता येणार नाही. तसेच ऑनलाईन अर्ज भरतांना खोटी किंवा विसंगत/दिशाभूल माहिती भरलेले निदर्शनास आल्यास संबंधीत उमेदवारावर फसवणूकीचा फौजदारी गुन्हा दाखल करण्यात येईल.

२) अंतिम निवड

अ) उमेदवाराची अंतिम निवड हि लेखी व तोंडी परिक्षेत मिळालेल्या एकुण गुणांच्या आधारे केली जाईल.

ब) एकाच स्थानासाठी दोन किंवा अधिक उमेदवारांना समान गुण मिळाल्यास खालील प्राधान्य क्रमाने उमेदवाराची अंतिम निवड केली जाईल.

१) अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकास उच्च शैक्षणिक अर्हता धारण करणारे उमेदवार, त्यानंतर

२) मागास वर्ग उमेदवाराच्या बाबतीत प्रथम अनुसुचीत जमाती नंतर अनुसुचीत जाती, विमुक्त जाती त्यानंतर

३) शारीरीक दृष्टया अपंग असलेले उमेदवार त्यानंतर

४) वय ( वयाने जेष्ट असलेल्या उमेदवाराचा क्रम वरती लागेल)

५) उमेदवाराची लेखी परिक्षा हि कोणत्याही कागदपत्रांची पुर्व तपासणी न करता केली जाणार असल्यामुळे लेखी परिक्षेत मिळालेल्या गुणांच्या आधारे उमेदवाराला निवडीबाबतचे कोणतेही हक्क राहाणार नाही. नियुक्तीपूर्वी मुळ शैक्षणिक अर्हता प्रमाणपत्रे, शाळा सोडल्याचा दाखला, अनुभवाचा दाखला, आवश्यक असल्यास नॉनक्रीमीलेअर दाखला, तसेच आवश्यक ती साक्षांकित प्रमाणपत्र इत्यादीची छानणी बँकेत केली जाईल, त्यावेळी मुळ प्रमाणपत्रे दाखविणेही बंधनकारक राहील. उमेदवाराने प्रमाणपत्र मिळणेकरीता सादर केलेल्या अर्जाच्या पावत्या ग्राह्य धरल्या जाणार नाहीत. छानणीअंती वरील प्रमाणपत्रांमध्ये त्रुटी आढळल्यास /माहिती खोटी आढळल्यास नियुक्ती दिली जाणार नाही/ नियुक्ती रद्द होईल.

६) वरील पदासाठी दिनांक १७/३/२०१३ रोजी परिक्षा ओएआर पध्दतीने घेण्यात येणार आहे.

७) अर्जदार हा महाराष्ट्राचा रहिवासी असावा व त्याबाबतो सक्षम अधिकारी यांच्याकडील प्रमाणपत्रे त्यांचेकडे असणे आवश्यक आहे. अर्जदार यांचेकडे अधिवास प्रमाणपत्र उपलब्ध नसल्यास शासन महसुल व वन विभागाकडील निर्णय नुसार त्यांचेकडे महाराष्ट्र राज्यात जन्म झालेबाबतचा पुरावा असणे आवश्यक आहे. सदर पदांसाठी आवश्यक अहर्ता असणारा महाराष्ट्र राज्यातील कोणताही उमेदवार अर्ज करु शकेल.

८) उक्त पदासाठी छानणी न करता जाहिराती नुसार परिपूर्ण अर्ज केलेल्या सर्व उमेदवारांना लेखी परिक्षेकरिता परिक्षा केंद्राचा संकेतांक क्रमांक, वेळ दिनांक इत्यादी तपशिल संकेतस्थळावर उपलब्ध होईल. लेखी परिक्षेचे प्रवेशपत्र संकेतस्थळावर प्राप्त करुन घेण्याची जवाबदारी संबंधीत उमेदवाराची राहील.

९) लेखी परिक्षेसाठी व लेखी परिक्षेत पात्र ठरलेल्या उमेदवारांना कागदपत्रांच्या छानणीसाठी तसेच मौखीक मुलाखती करीता स्वखर्चाने यावे लागेल.

१०) जिल्हा रोजगार, समाजकल्याण कार्यालय, एकात्मीक आदिवासी विकास मंडळ, तसेच जिल्हाधिकारी कार्यालयात नांव नोंदविलेल्या उमेदवारांना वरील पदासाठी विहीत नमुन्यात स्वतंत्रपणे ऑनलाईन अर्ज करणे व परिक्षा शुल्क भरणे आवश्यक आहे.

११) मागासवर्गिय उमेदवारांना शासन निर्णयानुसार नियुक्ती पूर्वी जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील.

१२) लेखी परिक्षेमध्ये गुणवत्ता यादीमध्ये येणा–या उमेदवारांना त्यांचे पदासाठी आवश्यक असणारे कागदपत्र पडताळणीचे वेळी सादर करणे अनिवार्य आहे.

१३) उमेदवाराने निवद प्रक्रीयेसंबंधात कोणत्याही प्रकारची शिफारस अथवा दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास त्याची उमेदवारी अपात्र ठरविण्यात येईल.

१४) अर्ज केला अथवा विहीत अर्हता धारण केली म्हणजे लेखी परिक्षेस बोलविण्याचा अथवा नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला असे उमेदवाराने समजू नये.

**परिक्षेचे स्वरुप व निवडपध्दती:**

| पद | लेखी परिक्षा गुण | मौखीक परिक्षा गुण | एकुण गुण | पात्र ठरण्याकरीता एकुण % |
|---|---|---|---|---|
| तृतीय श्रेणी लिपीक | ७५ | २५ | १०० | ४५% |
| चतुर्थ श्रेणी शिपाई | ७५ | २५ | १०० | ४५% |
| लेखी व मौखीक परिक्षेचे विषय: बँकिंग, मराठी, इंग्रजी, सामान्य ज्ञान व बौधीक क्षमता चाचणी असे राहातील. | | | | |

**रिक्त पदे भरतीचा कार्यक्रम:**

| | |
|---|---|
| जाहिरात प्रसिध्दी दिनांक | ३/३/२०१३ |
| ऑनलाईन अर्ज स्विकृती दिनांक | ५/३/२०१२ ते १२/३/२०१३ |
| हॉल टिकीट निर्गमन दिनांक | १३/३/२०१३ ते १७/३/२०१३ |
| परिक्षा दिनांक | १७/३/२०१३ |
| वेळ | सकाळी १०.३० ते ११.३० |
| निकाल प्रकाशीत दिनांक | १८/३/२०१३ |
| मुलाखत पत्र निर्गमन दिनांक | १९/३/२०१३ ते २३/३/२०१३ |
| वैयक्तीक मुलाखत दिनांक (अपेक्षीत) | २३/३/२०१३ |
| अंतीम निकाल प्रदर्शन दिनांक (अपेक्षीत) | २५/३/२०१३ |

**विशेष सूचना:**

१) या परिक्षेत ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरतांना जरी उमेदवारांना कोणतीही कागदपत्रे सादर करावयाची आवश्यकता नाही. तरीही ज्या उमेदवाराकडे पदाकरीता आवश्यक शैक्षणिक व इतर पात्रता नसेल अशा उमेदवारांनी विनाकारण अर्ज करु नयेत.

२) अर्जदारांनी अर्ज भरण्यासंदर्भात अडचीी असल्यास त्यासाठी ९५९४९६५४८१/ ९५९४९६५४८२/ ९५९४९६५४८३ या भ्रमणश्वनी वर संपर्क साधावा. भरती प्रक्रीयेत अर्ज भरण्याकरीता माहिती बँकेकडून पुरविली जाणार नाही.

३) भरती प्रक्रीये संबंधीची संपूर्ण माहिती ही वेबसाईट वर असेल, ती पाहाण्याची जवाबदारी ही पुर्णत: उमेदवाराची असेल त्याकरीता बँक जवाबदार राहाणार नाही.

४) उमेदवाराला भरती प्रक्रीयेसंबंधीच्या नियमांचे काटेकोर पणे पालन करणे बंधनकारक राहील.

-------()---------